**प्रेस नोट दि.०१/०८/२०१९**

**मुंढवा पोलीस ठाणे, पुणे शहर**

# गोडाऊन मधील माल लंपास करणाऱ्या कामगारास केले जेरबंद

**(जेव्हा कुंपण शेत खाते)**

मुंढवा पोलीस ठाणे हद्दीमध्ये धायरकर वस्ती येथे साऊंड फॅाक्टर नावाचे गोडाऊन मध्ये कामास असलेला इसम नामे शाहिद दस्तगिर सय्यद रा. मारुती मंदीरा जवळ, ताडीवाला रोड, पुणे.यास गोडाऊनचे मालक यांनी विश्वासाने गोडाऊन व त्यातील महागड्या वस्तु सांभाळण्यासाठी ठेवले होते.काहि महिन्यात मालकाचा विश्वास संपादन करुन शाहिद याने गोडाऊन मधील स्पिकर, ॲम्प्लीफायर अशा वेगवेगळ्या महागड्या वस्तु वेळोवेळी चोरुन त्या वस्तु त्याचा मित्र नामे युसुफ इस्माईल शेख रा.ताडीवाला रोड पुणे याचे सोबत विकण्यास सुरुवात केली.

सदर गोडाऊनचे मॅनेजर निरव पटेल यांना गोडाऊन मधील माल चोरी गेले बाबत माहिती मिळताच त्यांनी मुंढवा पोलीस ठाणे येथे गु.र.नं.२३७/२०१९ भादंवि ३८१,३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन त्या अनुषंगाने मुंढवा पोलीस स्टेशन कडील तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी आरोपी नामे शाहिद दस्तगिर सय्यद रा.मारुती मंदीरा जवळ, ताडीवाला रोड पुणे व युसुफ इस्माईल शेख रा.ताडीवाला रोड पुणे यांना विश्वासात घेऊन अधिक चौकशी केली असता त्यांनी सदर गोडाऊन मधुन चोरला असलेबाबत सांगितल्याने त्याना नमुद गुन्हयामध्ये अटक करुन त्यांची दि.०२/०८/२०१९ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आली आहे. नमुद आरोपीतांनी चोरलेल्या व घरी ठेवलेल्या अंदाजे ४,३८,७८१/-लाख किंमतीच्या वस्तु पंचनाम्याने जप्त करण्यात आल्या आहेत. तसेच उर्वरीत वस्तु मुंबई येथे विकल्या असल्याचे सांगितले आहे. त्याप्रमाणे पुढील तपास पोलीस उपनिरी अमोल गवळी हे करत आहेत.

सदरची कारवाई मा.श्री. सुनिल फुलारी, अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, पुणे, मा.श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५, पुणे, मा.श्री. सुनिल देशमुख, सहा. पोलीस आयुक्त, हडपसर विभाग, पुणे शहर, संपत भोसले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मुंढवा पोलीस ठाणे, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप-निरीक्षक अमोल गवळी, सहा पोलीस फौजदार सुरेश सोनवणे, पोहवा कैलास चव्हाण, पोना निलेश जगताप, अमोल गायकवाड, निलेश गायकवाड, अमोल चव्हाण, श्रीनाथ जाधव, संदेश काकडे, पोशि शाम शिंदे, दिपक कांबळे, यांनी उपरोक्त कामगिरी केली आहे.

**दि.०१/०८/२०१९**

**(संपत डी. भोसले)**
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
**मुंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर**